# मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना

## मार्गदर्शक सुचना - सन २०१७-१८

**प्रस्तावना**

मनुष्याच्या खादयपदार्थ सेवन करावयाच्या दैंनदिन सवयी बदलत चाललेल्या आहेत. वाढत्या वेगाने होणारे शहरीकरण, मोठया प्रमाणावर असणारा मध्यमवर्गीय गट व त्यांची खरेदी करण्याची क्रयशक्ती, लवचिक आयात धोरण आणि इतर शासकीय धोरणांमुळे अन्न प्रक्रिया उदयोगांना प्रोत्साहन मिळत आहे. भारतामध्ये अन्न प्रक्रिया उदयोग हा 5व्या क्रमांकावरील मोठा उदयोग आहे.

महाराष्ट्राची 65 टक्के लोकसंख्या कृषि व कृषि संलग्न क्षेत्राशी जोडलेली आहे.राज्यात प्रामुख्याने भात, ज्वारी, बाजरी, गहू, तूर, मूग, उडीद, हरबरा, व इतर डाळींचे उत्पादन होते. राज्यात भुईमुग,सूर्यफूल, सोयाबीनच्या बरोबर सरकी ही प्रमुख तेलबीया पिके आहेत, ऊस आणि हळद ही प्रमुख नगदी पिके आहेत. महाराष्ट्र राज्य वेगवेगळया फळ उत्पादनामध्ये देशामध्ये आघाडीवर आहे, त्यामध्ये आंबा, केळी, संत्रा, द्राक्षे, डाळींब, पेरु, कलिंगडांचे इत्यादी फळे आहेत. तसेच भाज्यांमध्ये टॉमॅटो, बटाटे, भेंडी, वांगी इत्यादींचे मोठया प्रमाणावर उत्पादन होते.

भारताची 90 टक्के मदयनिर्मिती महाराष्ट्रामध्ये केवळ द्राक्षापासून होते. आंबा, कांदा कडधान्य व तेलबियांवर मोठया प्रमाणावर अन्न् प्रक्रिया होते. द्राक्ष, संत्रा, डाळींब, काजू, स्टॉबेरी, टॉमेटो, ऊस, दुग्धोत्पादन, मासेमारी, कुक्कुटपालन यांचे मोठया प्रमाणावर होणारे उत्पादन ही राज्याची ओळख आहे. महाराष्ट्र राज्य जरी निरनिराळी पिके, फळपिके, यांचे उत्पादनामध्ये आघाडीवर असले तरी, प्रक्रिया उदयोग, कापणीनंतरच्या पायाभूत सोयी यांची कमतरता असल्याने मोठया प्रमाणावर होणारी अन्नाची नासाडी टाळण्यासाठी तसेच प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी राज्यपुरस्कृत “मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना” आणि केंद्र पुरस्कृत “प्रधानमंत्री किसान संपदा योजना” लागू केलेल्या आहेत.

दि. 20 जून 2017 च्या शासन निर्णयान्वये सन 2017-18 या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षांकरिता “मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना” ही 100 टक्के राज्यपुरस्कृत योजना लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवर्षी किमान 50.00 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद या योजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल. प्राप्त प्रस्तावांना तत्वत: मान्यता (IPA) (In Principle Approval) उपलब्ध निधीच्या

प्रमाणात देण्यात येईल. उदयोजकाने / लाभार्थ्याने राष्ट्रीयकृत बँक/ व्यापारी बँकेकडून कर्ज घेणे अपेक्षित आहे. यापूर्वी NHB / MOFPI / APEDA/ पणन मंडळ / केंद्र / राज्य शासनाच्या इतर संस्था यांचेकडून घेतलेल्या अनुदानाचा तपशील उदयोजकाने / लाभार्थ्याने प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे. उदयोजक / लाभार्थ्यास राष्ट्रीयकृत बँक/ व्यापारी बँकेकडून कर्ज मंजुर झाल्यानंतर प्रस्ताव सादर करावा व त्यास तत्वत: मान्यता (In Principle Approval) देण्यात येईल.

योजनेच्या संनियंत्रण व देखरेखीसाठी राज्यस्तरीय नियामक मंडळ मंत्रालयस्तरावर कार्यरत राहणार आहे. कृषि आयुक्तालयस्तरावर योजनेची अंमलबजावणी व प्रकल्प मंजुरी समिती मा.आयुक्त (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली कामकाज पाहील. प्रस्तावांची तपासणी करुन प्रस्ताव अभिप्रायासह मा.आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने समिती पुढे सादर करण्याची कार्यवाही संचालक, (कृषि प्रक्रिया व नियोजन) यांचेमार्फत करण्यात येईल. योजनेच्या विविध घटकांतर्गत अनुदान/अर्थसहाय्य मंजुरीचे अधिकार आयुक्तालय स्तरावरील प्रकल्प मंजुरी समितीस राहतील. योजनेस प्रसिध्दी, मूल्यमापन व मंजूर प्रकल्पांच्या फलनिष्पतीचा आढावा घेणेचे दायीत्व संचालक, (कृषि प्रक्रिया व नियोजन) यांचे राहील.

**उद्दिष्टे -**

1. केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न् प्रक्रिया अभियान या योजनेमध्ये केंद्र शासनाचा सहभाग {केंद्र : राज्य (75:25)} बंद झाल्यामुळे राज्य योजनेद्वारे अन्न प्रक्रिया उदयोगाला चालना देणे व सुरू ठेवणे.
2. शेतीमालाचे मूल्यवर्धन करण्याकरिता शेतकरी सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापीत करण्यास तसेच प्रकल्पांच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देणे.
3. उत्पादित मालास ग्राहकांची पसंती,बाजारपेठ निर्माण करणे व निर्यातीस प्रोत्साहन देणे.
4. कृषि व अन्न प्रक्रियाकरिता प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती करणे.
5. ग्रामीण भागात लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य देऊन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे.
6. राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियानांतर्गत मंजूर, भौतिकदृष्टया उत्पादन सुरु असलेल्या तथापि अनुदान प्रलंबित असणा-या प्रकल्पांना उर्वरित देय अनुदानाची रक्कम मंजूर करणे.

शासन निर्णयानुसार खालील चार उपघटकांना या योजनेखाली अर्थसहाय्य देय राहील.

1. कृषि व अन्न् प्रक्रिया प्रस्थापना, स्तरवृध्दी व आधुनिकीकरण.
2. शीतसाखळी योजना
3. मनुष्यबळ निर्मिती व विकास योजना
4. राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान अंतर्गत मंजुर, भौतिकदृष्टया उत्पादन सुरू असलेल्या तथापि अनुदान प्रलंबित असलेल्या प्रकल्पांकरिता देय उर्वरित अनुदानाची रक्क्म त्या योजनेचे प्रचलित निकषाप्रमाणे मंजूर करणे (उर्वरित देय रुपये ७३८.९२ लक्ष उर्वरित अनुदान अधिक रुपये ३४.५४ लक्ष प्रशासकीय खर्च असे एकूण ७७३.४६ लक्षच्या मर्यादेत)

**टिप :- वरील क्र. 1 व 2 या उपघटकांसाठी त्या त्या घटकासमोर निर्देशित मर्यादेपर्यंत स्वतंत्र अनुदान मागणी अनुज्ञेय राहिल.**

अ**. या योजनेवर सनियंत्रण व देखरेखीसाठी खालीलप्रमाणे नियामक मंडळ राहील**

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| 1. | मा. मंत्री (कृषि व फलो्पादन) | अध्यक्ष |
| 2. | मा. मंत्री (पणन) | सदस्य |
| 3. | मा. मंत्री (उद्योग) | सदस्य |
| 4. | मा. मंत्री (पदुम) | सदस्य |
| 5. | मा. मंत्री (सहकार) | सदस्य |
| 6. | मा. राज्यमंत्री (कृषि व फलो्पादन) | सदस्य |
| 7. | अपर मुख्य सचिव (सहकार) | सदस्य |
| 8. | प्रधान सचिव (कृषि) | सदस्य |
| 9. | प्रधान सचिव (पणन) | सदस्य |
| 10. | प्रधान सचिव / सचिव (उद्योग) | सदस्य |
| 11. | प्रधान सचिव / सचिव (पदुम) | सदस्य |
| 12. | आयुक्त कृषि | सदस्य सचिव |

ब. आयुक्तस्तरीय प्रकल्प मंजुरी व अंमलबजावणी समिती

(योजनेंतर्गत विविध घटकांतर्गत अनुदान व अर्थसहाय्य मंजुरीचे अधिकार आयुक्तस्तरीय प्रकल्प समितीला राहतील.)

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| 1. | आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| 2. | आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| 3. | आयुक्त, (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| 4. | आयुक्त, (दुग्ध्व्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| 5. | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ, पुणे | सदस्य |
| 6. | उपसचिव, (कृषि प्रक्रिया), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| 7. | उपसचिव, (उदयोग- २) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| 8. | समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे | सदस्य |
| 9. | संचालक, (कृषि प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| 10. | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| 11. | सहसंचालक, कृषि प्रक्रिया, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

क. **जिल्हास्तरीय मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना अंमलबजावणी समिती**.

जिल्हास्तरावर मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना अंमलबजावणी समिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| 2. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| 4. | शासकीय कृषि महाविद्यालय / कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ | सदस्य |
| 5. | जिल्हा व्यवस्थापक पणन मंडळ | सदस्य |
| 6. | जिल्हयातील कृषि व अन्न प्रक्रिया उदयोगाचा प्रतिनिधी | सदस्य |
| 7. | संबधित उपविभागीय कृषि अधिकारी | सदस्य |
| 8. | कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालय, | सदस्य सचिव |

जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

1) मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत जिल्हा कृषि व अन्न प्रक्रिया आराखडा तयार करणे.

2) जिल्हास्तरावर मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेचे समन्वयन, अंमलबजावणी तथा संनियंत्रण करणे व या अंतर्गत प्राप्त होणा-या प्रकल्पाचे /प्रस्तावाचे तपासणी करुन योग्य प्रस्ताव शिफारशीसह संचालक, (कृषि प्रक्रिया) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-5 यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे.

3) मंजुर करण्यात आलेल्या प्रकल्प/ योजनांच्या प्रगतीचे संनियंत्रण तसेच योजनेच्या प्रसिध्दीची कार्यवाही करणे.

4) संचालक, (कृषि प्रक्रिया) यांनी नेमून दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

5) आवश्यकतेनुसार वेळोवेळी योजनांचे मूल्यमापन करणे.

6) मंजूर योजनेसंबंधीच्या उद्दिष्टांच्या फलनिष्पत्तीचा आढावा घेणे.

मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व कार्यपध्दती यांचे अनुकरण व पालन सदर समिती करेल.

योजनेतंर्गत प्रस्तावित चार उपघटकांपैकी तिन उपघटकांतर्गत अर्थसहाय्य् देण्यासाठी पुढीलप्रमाणे घटकनिहाय मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. योजनेतील संबधित घटकांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव तत्वत: मान्यतेसाठी (In Principle Approval) संबधित जिल्हयाच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत सादर करावेत. अधिक माहितीसाठी संबधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / कृषि उपसंचालक (कृषि प्रक्रिया) द्वारा संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखरसंकुल, शिवाजीनगर, पुणे-५ यांचेशी संपर्क साधावा.

## उपघटक (1). कृषि व अन्न प्रक्रिया प्रस्थापना, स्तरवृध्दी व आधुनिकीकरण

**1.1 उद्देश.**

या उपघटकाखाली नवीन अन्न प्रक्रिया उद्‌योग स्थापन करणे. तसेच अस्तीत्वात असलेल्या अन्न प्रक्रिया उद्‌योगाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण या बाबींचा समावेश राहील.

**1.2 पात्र उदयोग.**

फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य, तेलबिया उत्पादने, इत्यादीवर आधारीत अन्न प्रक्रिया उदयोग.

**1.3 पात्र संस्था:**

फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया उत्पादने इत्यादीवर आधारीत अन्न प्रक्रिया प्रकल्प चालविणारे किंवा स्थापन करु इच्छित असलेले शासकीय/सार्वजनिक उदयोग, सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी /गट, महिला स्वयं:सहायता गट, खाजगी उदयोग क्षेत्र, ग्रामीण बेरोजगार युवक, सहकारी संस्था अशा अन्न प्रक्रिया प्रकल्पांपैकी फळे व भाजीपाला सारख्या नाशवंत शेतमालाच्या प्रक्रियेच्या प्रकल्पांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**1.4. आर्थिक सहाय्य**

1. कारखाना व सयंत्रे (Plant and Machinery) आणि प्रक्रिया प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी दालने (Civil work for housing processing unit) यांच्या बांधकाम खर्चाच्या 30 टक्के अनुदान, कमाल मर्यादा रु. 50.00 लाख.
2. या योजनेअंतर्गत अनुदान “क्रेडीट लिंकड बॅक एंडेड सबसिडी” या तत्वांनुसार दोन समान वार्षिक हप्त्यांत अ) प्रकल्प पुर्ततेनंतर व ब) **पूर्णक्षमतेने उत्पादनात** आल्यानंतर देण्यात येईल. (Commissioning of project and on start of production to full designed capacity)
3. प्रकल्पांना मंजूर करण्यात येणा-या अनुदानाच्या रक्कमेपेक्षा कर्जाची रक्कम किमान दीड पट असावी.

**1.5.** तत्वत: मान्यतेसाठी (In Principle Approval) **अर्ज स्वीकारणे.**

संचालक, (कृषि प्रक्रिया) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावे अर्जदार / उदयोजक प्रकल्प प्रस्ताव संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत तत्वत: मान्यतेसाठी सादर करतील.

प्रकल्पाचे काम सुरु होण्यापूर्वी अर्जदाराने किमान दोन महिने अगोदर विहित नमुन्यात मान्यतेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल, Annexure-I व Annexure-XI अन्वये विहित मार्गाने सादर करावा. परिच्छेद क्रमांक **1.8 मध्ये** विहित केलेली सर्व कागदपत्रे / माहिती प्रकल्पासोबत सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्प प्रस्ताव संचालक, (कृषि प्रक्रिया) यांचे अभिप्रायासह मा. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने आयुक्तस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीकडे तत्वत: मान्यतेसाठी (In Principle Approval) सादर करतील. प्रकल्प मंजुरी समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावाला संचालक, (कृषि प्रक्रिया) Annexure-XII मधील विहित नमुन्यात प्रवर्तकास कळवतील.

**1.6 अनुदान वितरण:** अनुदान दोन समान हप्त्यात वितरण केले जाईल.

**पहिल्या हप्त्याचे अनुदान वितरण:** प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर अनुदानाचा पहिला हप्ता देय होईल. तथापी खर्चाबाबतचे चार्टर्ड अकौंटंटचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रकल्पाची मोका तपासणी (Annexure-XVI) करुन सर्व कागदपत्रांची छाननी करुन खात्री झाल्यानंतर मंजूर अनुदानाच्या 50 टक्केचा पहिला हप्ता खालील कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वितरित करण्यात येईल.

i. **नोटराईजड हमीपत्र.** उदयोजकाने/ लाभार्थ्याने रु. 100/- च्या गैर न्यायिक स्टँपपेपर वर नोटराईजड हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. (Annexure-VII नुसार).

ii. **नोटराईजड प्रतिज्ञापत्र.** उदयोजकाने / लाभार्थ्याने रु. 100/- च्या गैर न्यायिक स्टँपपेपर वर नोटराईजड प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. (Annexure-VIII नुसार).

iii. **बँकेचे प्रमाणपत्र.** Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार बँकेकडून घेतलेल्या मुदत कर्जाचे वितरण झाले असल्याची खात्री व पहिल्या हप्त्याचे अनुदान वितरीत करण्याचे नाहरकत प्रमाणपत्र बँकेकडून आवश्यक आहे.

**iv.** **सी.ए. प्रमाणपत्र.** Annexure-IX नुसार उदयोजकाने मुदतीचे घेतलेले कर्ज व उदयोजक / लाभार्थीचे स्व:भांडवल खर्च झाल्याचे सी.अे. प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे. सी.ए. च्या प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार साईट तपासणी (मोका तपासणी - Annexure-XVI) केल्यानंतर अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येईल सी.अे. सिव्हिल / मॅकेनिकल इंजिनीअरचे प्रमाणपत्र उदयोजकाने / लाभार्थ्याने सादर करणे आवश्यक आहे.

**1.7.** **<u>अनुदानाचे दुस-या हप्त्याचे वितरण करणे</u> :** दुस-या हप्त्याचे अनुदान प्रकल्प पुर्ण क्षमतेने उत्पादनात आल्यानंतर वितरित करण्यासाठी जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीच्या प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत प्रकल्पांची भौतिक तपासणी (Annexure-XVI) केली जाईल. संबंधित प्रकल्पाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे व अनुदानाचा पहिला हप्ता व बँकेचे मुदतीचे कर्ज 100 टक्के खर्च झाल्याचे लेखापरिक्षित (Audited) उपयोगिता प्रमाणपत्र, त्याचप्रमाणे प्रवर्तकाचे 100 टक्के आर्थिक योगदान खर्च झालेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

i. **उपयोगिता प्रमाणपत्र:** जीएफआर-19 नुसार सीअेने प्रमाणित करणे आणि बँक आणि प्रवर्तक लाभार्थी कंपनीची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे. त्याकरिता Annexure-X पहावे.

ii. **सी.अे.चे प्रमाणपत्र :** Annexure-IX नुसार मुदतीचे कर्ज 100 टक्के आणि 100 टक्के प्रवर्तकाचे योगदान प्रत्यक्ष खर्च केल्याचा तपशील तसेच पहिल्या हप्त्याचे अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेनंतर अनुदान देय होईल.

iii. **बँकचे प्रमाणपत्र :** Annexure-III मध्ये नमूद केल्यानुसार राज्य शासनाने वितरित केलेल्या पहिल्या हप्त्याचे अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र व मुदत कर्ज 100 टक्के वितरित केलेमुळे अनुदानाचा दुसरा हप्ता वितरित करण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणे.

iv. **चार्टर्ड इंजिनिअर प्रमाणपत्र.**

बाबनिहाय आणि किंमतनिहाय तांत्रिक बांधकामे चार्टर्ड इंजिनिअरने (स्थापत्य/ वास्तुविशारद)ने प्रमाणित करावीत आणि बाबनिहाय किंमतनिहाय कारखान्याची आणि मशीनरीची तपशिलवार माहिती चार्टर्ड इंजिनिअरने (मशीनरी) प्रमाणीत केलेली असावी. सी.अे. सिव्हिल / मॅकेनिकल इंजिनीअरचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने /उदयोजकाने सादर करणे आवश्यक आहे

**1.8. सविस्तर प्रकल्प अहवालासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे: (ही यादी केवळ सुचक आहे)**

1. Annexure-I मध्ये नमूद केल्यानुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
2. डीपीआर- (तपशिलवार प्रकल्प अहवाल).
3. बँक किंवा वित्तीय संस्थाकडील मुदतीचे कर्ज मंजुरी पत्र.
4. बँक किंवा वित्तीय संस्थाकडील प्रकल्पाचा मंजुरी अहवाल (मुल्यमापन अहवाल (Appraisal Report) ) / मुदतीचे कर्ज वितरणाची तारीख.
5. प्रकल्पाचे नोंदणी प्रमाणपत्र (कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संस्था इत्यादी)
6. संस्थेची नियमावली आणि जेथे लागू असेल तेथे सोसायटीची नियमावली किंवा भागीदारी प्रकल्पाचा करारनामा.
7. प्रकल्पाधारकाची बायोडाटा, पार्श्वभूमी, प्रवर्तक, संस्थाविषयी माहिती.
8. वार्षिक अहवाल आणि मागील तीन वर्षाचे ऑडीट स्टेटमेंट, (फक्त विस्ताराविषयक आणि स्तर

उंचाविणे संदर्भातील प्रस्तावाकरीता आवश्यक (If applicable).

9. इमारतीची ब्ल्युप्रिंट.
10. जमिनीच्या संदर्भात 7/12 व 8अ जमीन भाडेपटटयावर घेतली असल्यास भाडेपटटयाचा कालावधी कमीतकमी १० वर्षे असावा. नोटोराईजड लीज डॉक्युमेंट.
11. बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती तांत्रिक सिव्हील बांधकामे आणि चार्टर्ड इंजिनिअर सिव्हील यांनी प्रमाणित केलेली.
12. बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती प्लॅन्ट आणि मशीनरीबाबत चार्टर्ड इंजिनिअर मशीनरी यांनी प्रमाणित केलेली असावी.
13. पुरवठादाराकडील प्रकल्पांसाठी लागणारी प्लॅन्ट मशीनरी आणि साहित्यांची दरपत्रके सादर करणे.
14. बाजारपेठेविषयी माहिती.
15. कृषि प्रक्रिया प्रकल्पाचा फलो (Flow) डायग्राम.
16. SSI (Small Scale Industries) / IEM (Industrial Entrepreneurs Memorandum) नोंदणी प्रमाणपत्र. (FSSAI (Food Safety and Standards Authority of India) चे नोंदणीपत्र दुसऱ्या हप्त्याचे अनुदान मंजुरीचे वेळेस आवश्यक.
17. प्रकल्प राबविण्याचे वेळापत्रक
    i. जमिनी अधिगृहीत केल्याची तारीख
    ii. इमारतीचे बांधकाम सुरु करण्याची तारीख
    iii. बांधकाम पूर्णत्वाची तारीख
    iv. प्लॅन्ट आणि मशीनरी उभारणीची तारीख
    v. प्रयोगिक तत्वावर उत्पादन सुरु करण्याची तारीख
    vi. व्यापारी तत्वावरील उत्पादन सुरु करण्याची तारीख
18. 100/- रुपयांचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन सादर करणे.
    अ. संस्थेचे भागीदार, संबंधित कंपन्या किंवा कंपन्यांचा समूह त्याचप्रमाणे कंपनी मालक यांनी स्वत: अन्न प्रक्रिया प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान अन्न प्रक्रिया मंत्रालयाकडून मिळाले किंवा नाही त्याची तपशिलवार माहिती सादर करणे.
    ब. पूर्वी संबंधित संस्थेने अनुदान मिळण्यासाठी केंद्रीय कृषि मंत्रालय /केंद्र सरकार/ केंद्र शासनाच्या संस्था/ यंत्रणा/ राज्य शासन / या प्रक्रिया उद्योगांसाठी संस्थेला अनुदान मिळण्यासाठी सादर केलेला तपशिल असेल तर सादर करावा.

**1.9. मंजुरी केलेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी आणि संनियंत्रण :**

तत्वत: मान्यता प्राप्त झाल्याच्या तारखेपासून प्रकल्पाच्या उभारणीचा कालावधी सुमारे 6 महिन्यांचा असेल. जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रकल्पाची प्रगती तपासणी Annexure-XVI व Annexure-XVII नुसार करुन अहवाल सादर करावा.

**उपघटक (2). <u>शीतसाखळी, मूल्यवर्धन आणि साठवणुकीच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना</u> :**

**2.1. उद्देश:**

शेतक-यांच्या दारापासून ते ग्राहकांपर्यंत किंवा उत्पादन क्षेत्र ते बाजारपेठेपर्यंत एकात्मिक आणि पूर्ण शीतसाखळी आणि साठवणुकीच्या सुविधा निर्माण करणे, या योजनेअंतर्गत उत्पादनाचे ठिकाणी प्रिकुलींग सुविधा, रेफर व्हॅन आणि फिरत्या शीतगृहासाठी अनुदान दिले जाईल.

**2.2 योजनेतील घटक: (पात्र उदयोग)**

अन्न् प्रक्रिया उदयोगाशी निगडीत पूर्वप्रक्रिया केंद्र (वजनकाटा, सॉर्टींग, ग्रेडिंग, पॅकींग, प्रीकुलिंग, चिलींग, कोल्ड स्टोरेज, IQF (Individually Quick Freezing) व एकात्मिक (Integrated) शीतसाखळी स्थापित करणे.

2.3. **पात्र संस्था**

फळे व भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य, तेलबिया, उत्पादने, इत्यादीवर आधारीत अन्न प्रकिया प्रकल्प चालविणारे किंवा स्थापित करीत असलेले शासकीय/सार्वजनिक उदयोग, सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी/गट, महिला स्वयंसहायता गट, खाजगी उदयोग क्षेत्र, ग्रामीण बेरोजगार युवक, सहकारी संस्था इत्यादी अशा अन्न प्रक्रिया प्रकल्पांपैकी फळे व भाजीपाला सारख्या नाशवंत शेतमालाच्या प्रक्रियेच्या प्रकल्पांना प्राधान्ये देण्यात येईल.

**2.4 आर्थिक सहाय्य**

2.4.1 कारखाना व यंत्रसामुग्री (Plant and Machinery) आणि तांत्रिक नागरी बांधकामाच्या किमतीच्या 30 टक्के अनुदान, कमाल मर्यादा रु. 50.00 लाख.

2.4.2 या योजनेअंतर्गत अनुदान क्रेडीट लिंक्ड बॅक एंडेड सबसिडी या तत्वानुसार दोन समान वार्षिक हप्त्यांत अ) प्रकल्प पूर्ततेनंतर व ब) **पूर्णक्षमतेने उत्पादनात** आल्यानंतर देण्यात येईल. (Commissioning of project and on start of production to full designed capacity)

2.4.3 प्रकल्पांना मंजूर करण्यात येणा-या अनुदानाच्या रक्कमेपेक्षा कर्जाची रक्कम किमान दीडपट असावी.

**2.5.** तत्वत: मान्यतेसाठी (In Principle Approval) अर्ज स्वीकारणे**.**

संचालक, (कृषि प्रक्रिया) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावे अर्जदार / उदयोजक प्रकल्प प्रस्ताव संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत तत्वत: मान्यतेसाठी सादर करतील. प्रकल्पाचे व्यापारी उत्पादन सुरु होण्यापूर्वी अर्जदाराने किमान दोन महिने अगोदर विहित नमुन्यात मान्यतेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल, Annexure-IV व Annexure-XI अन्वये विहित मार्गाने सादर

करावा. परिच्छेद क्रमांक 2.**8** मध्ये विहित केलेली सर्व कागदपत्रे / माहिती प्रकल्पासोबत सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्प प्रस्ताव संचालक, (कृषि प्रक्रिया) यांचे अभिप्रायासह मा. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने आयुक्तस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीकडे तत्वत: मान्यतेसाठी (In Principle Approval) सादर करतील. प्रकल्प मंजुरी समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावाला संचालक, (कृषि प्रक्रिया) Annexure-XII मधील विहित नमुन्यात प्रवर्तकास कळवतील.

**2.6 अनुदान वितरण:** अनुदान दोन समान हप्त्यात वितरण केले जाईल.

**पहिल्या हप्त्याचे अनुदान वितरण:** प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अनुदानाचा पहिला हप्ता देय होईल. तथापी खर्चाबाबतचे चार्टर्ड अकौंटंटचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रकल्पाची मोका तपासणी (Annexure-XVI) करुन सर्व कागदपत्रांची छाननी करुन खात्री झाल्यानंतर मंजूर अनुदानाच्या 50 टक्केचा पहिला हप्ता खालील कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वितरित करण्यात येईल.

i. **नोटराईजड हमीपत्र.** उदयोजकाने/ लाभार्थ्याने रु. 100/- च्या गैर न्यायिक स्टँपपेपर वर नोटराईजड हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. (Annexure-VII नुसार).

ii. **नोटराईजड प्रतिज्ञापत्र.** उदयोजकाने / लाभार्थ्याने रु. 100/- च्या गैर न्यायिक स्टँपपेपर वर नोटराईजड प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. (Annexure-VIII नुसार).

iii. **बँकेचे प्रमाणपत्र.** Annexure-V मध्ये नमूद केल्यानुसार बँकेकडून घेतलेल्या मुदत कर्जाचे वितरण झाले असल्याची खात्री व पहिल्या हप्त्याचे अनुदान वितरीत करण्याचे नाहरकत प्रमाणपत्र बँकेकडून आवश्यक आहे.

iv. **सी.ए. प्रमाणपत्र.** Annexure-IX नुसार उदयोजकाने मुदतीचे घेतलेले कर्ज व उदयोजक / लाभार्थीचे स्व:भांडवल खर्च झाल्याचे सी.अे. प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे. सी.ए. च्या प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार साईट तपासणी (मोका तपासणी- Annexure-XVI) केल्यानंतर अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येईल. सी.अे. सिव्हिल / मॅकेनिकल इंजिनीअरचे प्रमाणपत्र उदयोजकाने / लाभार्थ्याने सादर करणे आवश्यक आहे**.**

v. पुरवठादारांकडून / विक्रेताकडून प्राप्त् झालेल्या चलन / पावत्या

vi. उत्पादक व पुरवठादार यांनी पुरविलेल्या बाबींनुसार कामाची प्रगती गुणवत्ता, संख्या इत्यादीची तांत्रिक व भौतिक तपासणी केल्याचे चार्टर्ड इंजिनिअर (स्थापत्य/ वास्तु विशारद) चे प्रमाणपत्र.

vii. प्रकल्प मंजुरीनुसार उत्पादक व पुरवठादार यांनी पुरवठा केलेल्या कारखाना व सयंत्राची

तांत्रिक तपासणी व गुणवत्ता संदर्भातील चार्टर्ड इंजिनिअर (मशीनरी) चे अभिप्रायाचे प्रमाणपत्र.

viii. प्रकल्पाच्या भौतिक प्रगतीची साईट तपासणी प्रकल्प मंजुरीनुसार जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने करावी.

**2.7. <u>अनुदानाचे दुस-या हप्त्याचे वितरण करणे</u>:** दुस-या हप्त्याचे अनुदान प्रकल्पाचे उत्पादन पूर्ण क्षमतेने सुरु झाल्यानंतर वितरित करण्यासाठी जिल्हास्तरीय प्रकल्प अनुदान मंजुरी समितीच्या प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत प्रकल्पांची भौतिक तपासणी (Annexure-XVI) केली जाईल. संबंधित प्रकल्पाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे व अनुदानाचा पहिला हप्ता व बँकेचे मुदतीचे कर्ज 100 टक्के खर्च झाल्याचे लेखापरिक्षित (Audited) उपयोगिता प्रमाणपत्र, त्याचप्रमाणे प्रवर्तकाचे 100 टक्के आर्थिक योगदान खर्च झालेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

1. **उपयोगिता प्रमाणपत्र:** जीएफआर-19 नुसार सीअेने प्रमाणित करणे आणि बँक आणि प्रवर्तक/ लाभार्थी कंपनीची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे. त्याकरिता Annexure-X पहावे.
2. **सीअेचे प्रमाणपत्र :** Annexure-IX नुसार मुदतीचे कर्ज 100 टक्के आणि 100 टक्के प्रवर्तकाचे योगदान प्रत्यक्ष खर्च केल्याचे प्रमाणपत्र तसेच पहिल्या हप्त्याचे अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अनुदान देय होईल.
3. **बँकेचे प्रमाणपत्र:** Annexure-V मध्ये नमूद केल्यानुसार राज्य शासनाने वितरित केलेल्या पहिल्या हप्त्याचे अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र व मुदत कर्ज 100 टक्के वितरित केलेमुळे अनुदानाचा दुसरा हप्ता वितरित करण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणे.
4. **चार्टर्ड इंजिनिअर प्रमाणपत्र:**

   बाबनिहाय आणि किंमतनिहाय तांत्रिक बांधकामे चार्टर्ड इंजिनिअरने (स्थापत्य / वास्तुविशारद) ने प्रमाणित करावीत आणि बाबनिहाय किंमतनिहाय कारखान्याची आणि मशीनरीची तपशिलवार माहिती चार्टर्ड इंजिनिअरने (मशीनरी) प्रमाणीत केलेली असावी. उदयोजकाने / लाभार्थ्याने सदरची प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**2.8. सविस्तर प्रकल्प अहवालासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे (ही यादी केवळ सुचक आहे)**

1. Annexure IV मध्ये नमूद केल्यानुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
2. डीपीआर- (तपशिलवार प्रकल्प अहवाल).
3. बँक किंवा वित्तीय संस्थाकडील मुदतीचे कर्ज मंजुरी पत्र.
4. बँक किंवा वित्तीय संस्थाकडील प्रकल्पाचा मंजुरी अहवाल (मुल्यमापन अहवाल (Appraisal Report) ) / मुदतीचे कर्ज वितरणाची तारीख.

5. प्रकल्पाचे नोंदणी प्रमाणपत्र (कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संस्था इत्यादी)
6. संस्थेची नियमावली आणि जेथे लागू असेल तेथे सोसायटीची नियमावली किंवा भागीदारी प्रकल्पाचा करारनामा.
7. प्रकल्पाधारकाची बायोडाटा, पार्श्वभूमी ,प्रवर्तक संस्थाविषयी माहिती.
8. वार्षिक अहवाल आणि मागील तीन वर्षाचे ऑडीट स्टेटमेंट, (विस्ताराविषयक आणि स्तर उंचाविणे संदर्भातील प्रस्तावाकरीता आवश्यक) (If applicable).
9. ईमारतीची ब्ल्युप्रिंट.
10. जमिनीच्या संदर्भात 7/12 व 8अ जमीन भाडेपटटयावर घेतली असल्यास भाडेपटटयाचा कालावधी कमीतकमी 10 वर्षे असावा. नोटोराईजड लीज डॉक्युमेंट.
11. बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती तांत्रिक सिव्हील बांधकामे आणि चार्टर्ड इंजिनिअर (स्थापत्य / वास्तुविशारद) यांनी प्रमाणित केलेली असावी.
12. बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती प्लॅन्ट आणि मशीनरीबाबत चार्टर्ड इंजिनिअर मशीनरी यांनी प्रमाणित केलेली असावी.
13. पुरवठादाराकडील प्रकल्पांसाठी लागणारी प्लॅन्ट मशीनरी आणि साहित्यांची दरपत्रके सादर करणे.
14. बाजारपेठेविषयी माहिती.
15. कृषि प्रक्रिया प्रकल्पाचा फलो (Flow) डायग्राम.
16. SSI (Small Scale and Industries) / IEM (Industrial Entrepreneurs Memorandum) नोंदणी प्रमाणपत्र (FSSAI (Food Safety and Standards Authority of India) चे नोंदणीपत्र दुसऱ्या हप्त्याचे अनुदान मंजुरीचे वेळेस आवश्यक आहे.
    प्रकल्प राबविण्याचे वेळापत्रक
    i. जमिनी अधिगृहीत केल्याची तारीख
    ii. इमारतीचे बांधकाम सुरु करण्याची तारीख
    iii. बांधकाम पुर्णत्वाची तारीख
    iv. प्लँन्ट आणि मशीनरी उभारणीची तारीख
    v. प्रयोगिक तत्वावर उत्पादन सुरु करण्याची तारीख
    vi. व्यापारी तत्वावरील उत्पादन सुरु करण्याची तारीख
    vii. प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्याची तारीख
17. 100/- रुपयांचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन सादर करणे.
    अ. संस्थेचे भागीदार, संबंधित कंपन्या किंवा कंपन्यांचा समूह त्याचप्रमाणे कंपनी मालक यांनी स्वत: अन्न प्रक्रिया प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान अन्न प्रक्रिया मंत्रालयाकडून मिळाले किंवा नाही त्याचा तपशिलवार माहिती सादर करणे.
    ब. पूर्वी संबंधित संस्थेने अनुदान मिळण्यासाठी केंद्रीय कृषि मंत्रालय /केंद्र सरकार/ केंद्र शासनाच्या संस्था/ यंत्रणा/ राज्य शासन / या प्रक्रिया उद्योगांसाठी संस्थेला अनुदान मिळण्यासाठी सादर केलेला तपशिल असेल तर सादर करावा.

**2.9. मंजुरी केलेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी आणि संनियंत्रण:**

मंजूरी पत्र जारी करण्याच्या तारखेपासून प्रकल्पाच्या उभारणीचा अंमलबजावणीचा कालावधी सुमारे 6 महिन्यांचा असेल. जिल्हा स्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रकल्पाची प्रगती तपासणी Annexure-XVI व Annexure-XVII नुसार करुन अहवाल सादर करावा.

## उपघटक (3). मनुष्यबळ निर्मिती व विकास योजना

**3.1** मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेत अर्थसहाय्य उपलब्ध झालेल्या उद्योगांना प्राधान्य राहील. अन्न प्रक्रिया उदयोगास आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीसाठी खालील प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करता येतील किंवा सदर प्रशिक्षण संस्थेच्या वार्षिक आराखडयातील समाविष्ट प्रशिक्षणात सहभाग घेता येईल.

3.2 **संस्था**

i. CFTRI (Central Food Technological Research Institute) Mysore.

ii. NIFTEM (National Institute of Technology Entrepreneurship and Management) Sonepat, Haryana.

iii. महाराष्ट्र राज्यातील खालील कृषि विदयापीठामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करता येतील.

   a. महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी

   b. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विदयापीठ, दापोली

   c. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ, अकोला

   d. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापीठ, परभणी

**3.3 आर्थिक सहाय्य:**

राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगाच्या गरजेनुसार मनुष्यबळ प्रशिक्षित करण्यासाठी असलेल्या वरील संस्थामध्ये देण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के अनुदान देय राहील.

**3.4 उद्दिष्टे:**

i. उद्योजक विकास कार्यक्रमांतर्गत, ज्या उदयोजकांना अन्नप्रक्रिया उद्योग स्थापन / प्रगत करावयाचे आहेत त्यांचे कर्मचारी/अधिकारी/तंत्रज्ञ यांना प्रशिक्षणासाठी विशिष्ट उच्च स्तरीय प्रशिक्षण ठराविक कालावधीमध्ये देणे.

ii. अन्न् प्रक्रिया उदयोग सुरु असलेल्या व ज्या उदयोजकांना त्यांच्या प्रक्रिया उदयोगाचा विस्तार / आधुनिकीकरण करण्याची इच्छा आहे. त्यांचेकडील मनुष्यबळाचे प्रशिक्षणार्थीचे ज्ञान / कौशल्य पातळी सुधारण्यासाठी प्रशिक्षण देणे.

**3.5 पात्रता निकष:**

राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगात काम करत असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांना प्रशिक्षित करण्याच्या उद्देशाने प्रक्रिया उदयोगाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार करण्यात येईल. मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेत अर्थसहाय्यासाठी पात्र ठरलेल्या उद्योगातील मनुष्यबळ प्रशिक्षित करण्यास प्राधान्य राहील.

**3.6 अनुदानाचे स्वरुप**.

आयुक्तस्तरीय प्रकल्प मंजूरी समिती अन्न प्रक्रिया उद्योगांनी सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने अनुदानास मंजूरी देईल. यामध्ये प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के अनुदान थेट प्रशिक्षण संस्थांना देण्यात येईल किंवा प्रकल्प मंजूरीनंतर उद्योगांनी प्रशिक्षण शुल्क स्वत: पुर्ण भरले असल्यास त्यांना ५० टक्के अनुदान थेट देण्यात येईल.

**3.7 अर्ज सादर करणे:**

उदयोजकांनी त्यांचेकडील मनुष्यबळ प्रशिक्षित करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळणेकरीता त्यांचे अर्ज संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराने विहित नमुन्यात Annexure-VI मध्ये सर्व संबधित / कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**3.8** वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या जाहिरातीच्या आधारे प्रशिक्षणार्थींचे अर्ज मागवून पारदर्शक पध्दतीने निवड करण्यात येईल.

**3.9 प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

i. उदयोजकाकडे कार्यरत असलेल्या एकुण तांत्रिक मनुष्यबळाची सविस्तर माहिती.
ii. उदयोजकाने प्रकल्प उभारणीसाठी कोणत्या योजनेतून अर्थसहाय्य घेतेले आहे या बाबतची माहिती.
iii. प्रशिक्षित करावयाच्या तांत्रिक कर्मचारी/ अधिकारी यांच्या शैक्षणीक आर्हतेबाबतचा तपशील व कागदपत्रे.
iv. प्रशिक्षित करावयाच्या तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांचे हमीपत्र.

**Annexure - I**

**Application Form for Scheme of Technology Upgradation / New Establishment/ Modernisation of Food Processing Industries under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

| S/No | Particulars | Details |
|---|---|---|
| **A.** | **Promoters** | |
| 1 | Name and address of the promoter including telephone, fax,email etc | |
| 2 | Type of organization like Govt institution / organization, industry association, university, NGO, Co-operative,others etc | |
| 3 | Background/credentials of applicant organization | |
| 4 | Financial status / ITR filed. | |
| 5 | Existing industry if any | |
| **B.** | **Project Description** | |
| 6 | Name of the project | |
| 7 | Location/Area of the project | |
| 8 | Products / By products | |
| 9 | Process with complete flow chart | |
| 10 | Technology (Indigenous/important) | |
| 11 | Capacity of the plant /unit | |
| 12 | In case of expansion/modernization of existing facilities/unit (details of existing capacity and proposed capacity after expansion and alongwith capacity utilization) | |
| **C.** | **Project cost (Indicating proposed cost, appraised cost separately)** | |
| 13 | Capital investment (Fixed capital) | |
| | i. Land Area Cost | |
| | ii. Building | |
| | iii. Civil works | |
| | iv. Technical civil works | |
| 14 | Plant & Machinery (Indigenous) (Capacity/Specification/cost) | |
| 15 | Imported Machinery ) (Capacity/Specification/cost) | |
| 16 | Pre-operative expenses | |
| 17 | Working capital | |
| 18 | Raw material required / packaging (Source/quantity/cost) | |
| 19 | Labour (Quantity/cost) / Employment Generation. | |
| 20 | Effluent disposal (Method/Machinery/cost) | |
| **D.** | **Means of Finance (Indicating proposed and appraised means of finance, separately** | |
| 21 | Means of financing | |
| | a. Equity promoter /Foreign/Others | |
| | b. Loan(Term/working capital) | |
| | c. Grant in aid under scheme | |
| | d. Other sources | |
| | **Total** | |
| 22 | Financial benchmarks | |
| | a. Cash flow / Current ratio. | |
| | b. Break even point | |
| | c. Internal rate of return | |
| | d. Debt equity ratio | |
| | e. Debt service coverage ratio | |
| 23. | In case of expansion/modernization all the above benchmarks to be given separately – existing / as well as projected | |
| 24 | In case of expansion/modernization proposals audited balance sheet of last threre years to be enclosed | |

| | | | |
|---|---|---|---|
| **E.** | **Marketing** | | |
| 25 | Marketing | | |
| | a. Existing market | | |
| | b. Future demand | | |
| | c. Marketing strategy | | |
| | d. Linkage to farm/backward linkages | | |
| | e. Forward market linkages | | |
| **F.** | **Implementation schedule** | | |
| 26 | Item of work | Date of implementation (Bar charts/milestone charts may be enclosed) | |
| **G.** | **Personnel** | | |
| 27 | Details of technical and managerial personnel (Operation, maintenance, managerial, finance, marketing etc.) requied and available | | |
| **H.** | **Employment Generation – Direct/Indirect** | | |
| 28 | a. Direct (Male and female separately) | | |
| | b. Indirect (Male and female separately) | | |

**Signature**
**Date :** **Name and Designation**
**Place :** **Seal of the organization**

Encl: List of documents attached.

**Annexure-II**

**Scheme of Technology Upgradation / New Establishment/ Modernisation of Food Processing Industries under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

**(Letter Head of the Bank)**

**Certificate**

1. Certified that this bank has appraised the project of M/s ………………….. (Name and address of the organization) for Chief Minister Agriculture And Food Processing Scheme (2017-18) grant as per guidelines of the scheme and also sanctioned term loan of Rs. ……….. Lakh (If applicable)

2. It is further certified that we have released Rs…….. lakh to M/s ………………………. (Name and address of the organization).
3. We have no objection in releasing 1st instalment of grant if sanctioned by the State Govt.

(Signature)
(Name)
(Branch Manager)
(Branch IFSC Code)

Director, Agro Processing and Planning
Commissionerate of Agriculture Maharashtra State

---

**Annexure- III**

**Scheme of Technology Upgradation / New Establishment/ Modernisation of Food Processing Industries under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

**(Letter Head of the Bank)**

**Certificate**

1. Certified that this bank has released 100% of term loan (if applicable) sanctioned i.e. Rs. ……..lakh and also 1st instalment of grant of Rs. …….. lakh released by the Chief Minister Agriculture And Food Processing Scheme (2017-18) vide sanction order No. ………. Dated………. to M/s ………………….. (Name and address of the organization), which has been credited in account number…….. of the firm.

2. We have no objection in releasing 2nd instalment of grant if sanctioned by the State Govt.

(Signature)
(Name)
(Branch Manager)
(Branch IFSC Code)

Director Agro Processing and Planning
Commissionerate of Agriculture Maharashtra State

**Annexure -IV**

**Application Form for Scheme of Cold chain, value addition and Preservation infrastructure under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

| S/No | Particulars | Details |
|---|---|---|
| | **A. Promoters** | |
| 1 | Name and address of the promoter including telephone, fax,email etc | |
| 2 | Type of organization like Govt institution / organization, industry association, university, NGO, Co-operative,others etc | |
| 3 | Background/credentials of applicant organization. Details of having experience in food processing or supply chain management if any, | |
| 4 | Financial status / ITR Filed | |
| 5 | Existing Industry, if any | |
| | **B. Project Description** | |
| 6 | Name of the project | |
| 7 | Location/Area of the project | |
| 8 | Products / By products | |
| 9 | Cold chain process with complete flow chart | |
| 10 | Technology (Indigenous/important) | |
| 11 | Capacity of varios components of the Integrated cold chain (Cold storage, CA/MA chamber, Deep freezer, IQF (in MT/Hr.), Reefer Van (in numbers and in MT) | |
| 12 | In case of expansion/modernization of existing facilities/unit (details of existing capacity and proposed capacity after expansion and alongwith capacity utilization) | |
| | **C. Project cost (Indicating proposed cost, appraised cost separately)** | |
| 13 | Capital investment (Fixed capital) | |
| | i. Land Area Cost | |
| | ii. Building | |
| | iii. Civil works | |
| | iv. Technical civil works | |
| 14 | Plant & Machinery (Indigenous) (Capacity/Specification/cost) | |
| 15 | Imported Machinery ) (Capacity/Specification/cost) | |
| 16 | Pre-operative expenses | |
| 17 | Working capital | |
| 18 | Raw material required / packaging (Source/quantity/cost) | |
| 19 | Labour (Quantity/cost) / Employment Generation | |
| 20 | Effluent disposal (Method/Machinery/cost) | |
| | **D. Means of Finance (Indicating proposed and appraised means of finance, separately** | |
| 21 | Means of financing | |
| | a. Equity promoter /Foreign/Others | |
| | b. Loan(Term / working capital) | |
| | c. Grant in aid under scheme | |
| | d. Other sources | |
| | **Total** | |
| 22 | Financial benchmarks | |
| | a. Cash flow / Current ratio | |
| | b. Break even point | |
| | c. Internal rate of return | |
| | d. Debt equity ratio | |
| | e. Debt service coverage ratio | |
| 23. | In case of expansion/modernization all the above benchmarks to be given separately – existing / as well as projected | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **E. Marketing** | | |
| 24 | Marketing | | |
| | a. Existing market | | |
| | b. Future demand | | |
| | c. Marketing strategy | | |
| | d. Linkage to farm/backward linkages | | |
| | e. Forward market linkages | | |
| | **F. Implementation schedule** | | |
| 25 | Item of work | Date of implementation (Bar charts/milestone charts or PERT/CPM may be enclosed) | |
| | **G. Personnel** | | |
| 26 | Details of technical and Managerial personnel (Operation, maintenance, managerial, finance, marketing etc.) requied and available | | |
| | **H. Employment Generation – Direct/Indirect** | | |
| 27 | a. Direct (Male & Female Separately) | | |
| | b. Indirect (Male & Female Separately) | | |

**Signature**
**Name and Designation**
**Seal of the organization**

Date **:**
Place **:**

**Encl**: List of documents attached.

**Annexure-V**

**Scheme of Cold chain, value addition and Preservation infrastructure under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

**(Letter Head of the Bank)**

## Certificate

1. Certified that this bank has appraised the project of M/s ………………….. (Name and address of the organization) for Chief Minister Agriculture and Food Processing Scheme grants as per guidelines of the scheme and also sanctioned term loan of Rs. ………lakh (if applicable).

2. It is further certified that we have released Rs…….. lakh to M/s ………………………………. (Name and address of the organization).

3. We have no objection in releasing 1st / 2nd (delete whichever not applicable) instalment of grant if sanctioned by the State Govt.

(Signature)
(Name)
(Branch Manager)
(Branch IFSC Code)

Director Agro Processing and Planning
Commissionerate of Agriculture
Maharashtra State, Pune

**Annexure- VI**

**Implementation of HRD Scheme under Chief Minister Agriculture and Food Processing Scheme**

**Application form**

**For assistance under the Training at recognised institutes such as CFTRI / NIFTEM / Agriculture universities in Maharashtra**

